D:\Dinesh Patil\Kandalvan\Tembhi S.No.117.doc:

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पालघर यांचे कार्यालय

पार्श्वनाथ- ९, बिडको नाका रोड,माहिम, ता.जि. पालघर
दुरध्वनी. क्र.०२५२५-२५३१११ Email ID :- Collectorpalghar@gmail.com

**क्र/महसूल/कक्ष-१/टे-जमीनबाब /कांदळवन/कावि-२८८/२०** **दिनांक:-२१/१०/२०२०**

**प्रति,**
**मा.सदस्य सचिव,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष,मुंबई.**

**विषय** :- मौजे- टेंभी, ता.वसई,जि.पालघर येथील भूमापन क्र.११७ हि.क्र.०१ या शासकीय जमिनीवर कांदळवन कत्तल/पाणथळ क्षेत्राचा नाश केल्याबाबत..
कांदळवन तक्रार क्र.१२९ - तक्रारदार श्री.मर्सेलीन रुडाल्फ कोरीया

**संदर्भ** :- १) श्री.मर्सेलीन रुडाल्फ कोरीया यांनी दि. २९/०७/२०२० रोजी ई-मेलव्दारे केलेली तक्रार
२) आपलेकडील पत्र क्र.ल.ले./३३/सन २०२०-२१, दि.०८/१०/२०२०
३) उपविभागीय अधिकारी वसई यांच्याकडील पत्र क्र.व्हीडी/टे-२/जमिनबाब/कावि-३११/२०, दि.०८/१०/२०२०

8 tenp:
add minitury

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मौजे-टेंभी, ता.वसई, जि.पालघर येथील भूमापन क्र.११७ हि.क्र.०१ या शासकीय जमिनीवर कांदळवन कत्तल / पाणथळ क्षेत्राचा नाश केल्याबाबत श्री. मर्सेनीन रुडाल्फ कोरीया यांनी ई-मेलव्दारे तक्रार केली असून, सदर तक्रारीचे अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करुन तसा अहवाल सादर करण्याबाबत आपलेकडील वरील संदर्भीय अ. क्र. ०२ च्या पत्रान्वये कळविले होते.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी वसई यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली असून, मौजे-टेंभी, ता.वसई, जि.पालघर येथील भूमापन क्र.११७ हि.क्र.०१ या जमिनीत स्थळपाहणीच्या वेळी कांदळवनाची कत्तल केल्याचे दिसुन आलेले नसल्याचे त्यांनी त्यांचेकडील संदर्भाधिन पत्र क्र. ०३ अन्वये अहवाल सादर केलेला आहे.

सोबत उपविभागीय अधिकारी वसई यांचेकडील संदर्भाधिन अ.क्र.०३ च्या अहवालाची छायांकित प्रत जोडली आहे. तरी सदर तक्रार आपले स्तरावरुन निकाली काढण्यास विनंती आहे.

**(डॉ किरण महाजन )**
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय पालघर**

स्थळ प्रतिवर मा.जिल्हाधिकारी यांची सही असे

Jiladhikari report

उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी वसई यांचे कार्यालय
जुने शासकीय विश्राम गृह, किल्ला बंदर रोड, मालोंडे, वसई गांव, ता. वसई, जि.
पालघर पिन - ४०१ २०१.
दुरध्वनी क्र. (०२५०) २३२०८८० Email ID - vasaisdo@gmail.com

कांदळवन तक्रार

क्रमांक/व्हीडी/टे-२/जमिनबाब/कावि - ३७७/२०
दिनांक :- ०८/१०/२०२०

प्रति,
मा. जिल्हाधिकारी पालघर
( महसूल शाखा )

विषय :- मौजे- टेंभी ता. वसई येथील भुमापन क्रमांक ११७/१ या शासकीय पाणथळ जमिनीमधील नैसर्गिक खाडीच्या भरती ओहटी क्षेत्रातील कांदळवनाची कत्तल केल्याबाबत..

तक्रारदार श्री. मर्सेलीन रूडाल्फ कोरिया रा. टेंभी - कोल्हापुर

संदर्भ :- १) आपलेकडील पत्र क्र. महसूल/कक्ष-१/टे-जमिनबाब/ कावि २८८/२०२० दिनांक २९/०७/२०२०
२) तहसिलदार वसई यांचेकडील पत्र क्र. मशा/कक्ष-१/टे-जमिनबाब/ कांदळवन- वेटलँड/ कावि-३३/२०२० दि. ०१/१०/२०२०

मा.महोदय,

उपरोक्त उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यांत येते की, तक्रार अर्जदार श्री. मर्सेलीन रूडाल्फ कोरिया रा. टेंभी- कोल्हापुर, विरार (प)ता. वसई जि. पालघर यांनी आपल्या कार्यालयांत मौजे- टेंभी ता. वसई येथील भुमापन क्रमांक ११७/१ या शासकीय पाणथळ जमिनीमधील नैसर्गिक खाडीच्या भरती ओहटी क्षेत्रातील कांदळवनाची कत्तल केलेल्या विनंती अर्जाची तहसिलदार वसई यांच्या मार्फत स्थानिक चौकशी केली असता, त्यांनी संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये खालील प्रमाणे अहवाल सादर केला आहे.

दिनांक २९/०७/२०२० रोजी वनक्षेत्रपाल कांदळवन पालघर यांचे समवेत अर्जात उल्लेख केलेल्या जागेची पाहणी केली असता अर्जातील उल्लेख मौजे- टेंभी ता. वसई येथील स. नं. ११७/१ क्षेत्र ५-०२-१० (हे.आर) या जागेत श्री. कॅजीटन डॉमणिक परेरा यांनी चार मजली घर बांधले असुन सदर घराचे मोजमाप घेतले असुन ते १३ X ५ = ६५ चौ.मी. आहे.

सदर बांधकाम धारकाने सादर केलेले पुरावे पाहता सदर बांधकाम त्यांनी २०१७ मध्ये सुरु केलेले असुन सदर घराला ग्रामपंचायत घर क्रमांक ८०५/ब ची घरपट्टी असुन सदर ठिकाणी जुने



Scanned by CamScanner

लघर पिन -
Id- vasa
/१

Jiladhikari report

मोडकीस आलेले घर मोडून नविन बांधकाम केलेले आहे. जागेवर समक्ष पंचनामा केल्या असुन जागा पाहणी वेळी कोणत्याही प्रकारची कांदळवनाची कत्तल सदर ठिकाणी केलेली दिसून आली नाही.

सदर बांधकाम धारकांकडे पुर्वीचे जुने घर असलेबाबत ग्रामपंचायत घरपट्टया आढळून आल्या आहेत. सदर स. नं. ११७/१ ही जागा ७/१२ सदरी बिन आकारी पड असुन पिक पाहणी सदरी ग्रामसचिवालय, ग्रा. पं. मार्केट, टेंभीगाव / जि. प. शाळा व झोपडया अशी नोंद सन २००८/२००९ पासुन आहेत. तसेच संपुर्ण जागेत टेंभीगाव अंदाजे लोकसंख्या १२००, कुंभारवाडा गाव अंदाजे लोकसंख्या ४००, ग्रामसचिवालय, ग्रा. प. मार्केट, जि. प. शाळा इत्यादी वास्तु आहेत.

दिनांक २९/०७/२०२० रोजी वनक्षेत्रपाल कांदळवन पालघर यांचे समवेत अर्जात उल्लेख केलेल्या जागेची पाहणी व पंचनामा केल्या असुन जागा पाहणी वेळी कोणत्याही प्रकारची कांदळवनाची कत्तल सदर ठिकाणी केलेली दिसून आली नाही. सदर जागेचा संयुक्त पंचनामा केल्या असुन, जबाब, पंचनामे, छायाप्रत व ७/१२ चे उतारेसह अहवाल पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर करीत आहोत.

उपविभागीय अधिकारी वसई

Scanned by CamScanner

# तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई यांचे कार्यालय

( महसूल शाखा )

किल्लाबंदर रोड, मालोंडे , वसई गांव, ता. वसई, जि. पालघर पिन कोड क्र.४०१२०१
दुरध्वनी क्रमांक ( ०२५० ) २३२२००७

---

क्र.मशा/कक्ष-१/टे-जमीनबाब/कांदळवन-वेटलँड/कावि-33 /२०२० दिनांकः- /०८/२०२० 09/10/2020

प्रति,

मा.अध्यक्ष, तालुका स्तरीय कांदळवन समिती
तथा उपविभागीय अधिकारी,वसई विभाग, वसई

विषय :-मौजे-टेंभी ता.वसई येथील भुमापन क्रमांक ११७ हि.क्र.०१ या शासकिय पाणथळ जमिनीमधील नैसर्गीक खाडीच्या भरती ओहटी क्षेत्रातील कांदळवनाची कत्तल केल्याबाबत.

संदर्भ :-मा.जिल्हाधिकारी पालघर यांचेकडील पत्र क्र.महसूल/कक्ष १/टे जमिनबाब/कावि २८८/२०२० दि.२९/०७/२०२०

सविनय सादर करणेंत येते की, श्री मर्सेलिन रुडाल्फ कोरीया, रा.टेंभी कोल्हापूर, विरार, ता.वसई, जि.पालघर यांनी मौजे-टेंभी ता.वसई येथील भुमापन क्रमांक ११७ हि.क्र.०१ या शासकिय पाणथळ जमिनीमधील नैसर्गीक खाडीच्या भरती ओहटी क्षेत्रातील कांदळवनाची कत्तल केल्याबाबत केलेली तक्रार संदर्भिय पत्रान्वये आपले कार्यालयास प्राप्त झाली आहे.

त्यानुषंगाने उक्त जमिन मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी वनक्षेत्रपाल कांदळवन कक्ष-पालघर व तलाठी यांनी दिनांक २९/०७/२०२० रोजी केली असता, सदर ठिकाणी कांदळवनाची तोड झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसा त्यांनी जागेवर पंचनामा केला आलो असून जागेवरील वस्तुस्थितीचा फोटोसह अहवाल तलाठी यांनी त्यांचेकडील दिनांक ३०/०७/२०२० रोजीचे पत्रान्वये इकडील कार्यालयात सादर केला आहे.

तरी सदरची बाब जिल्हास्तरिय कांदळवन समिती यांना आपले स्तरावरुन कळविणेस विनंती आहे.

(signature)
तहसिलदार वसई

प्रतः- मा.जिल्हाधिकारी पालघर (महसूल शाखा) यांना माहीतीसाठी सविनय सादर.

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner